नौपाडा वाहतूक उप विभागाचे हद्दीत निर्गमित करण्यात आलेली वाहतूक नियंत्रण अधिसूचना

पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर
तीन हात नाका, एल.बी.एस. मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)
दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६
Email ID – cp.thane.dcptraffic@mahapolice.gov.in

जा.क्र. पोउपआ/वावि/अधिसूचना/ ४२१ /२०२६ दि. १९ /०६/२०२६

–: वाहतूक नियंत्रण अधिसुचना :–

ज्याअर्थी, नौपाडा वाहतूक उपविभागाचे हद्दीत धर्मविर कट कडून परमार्थनिकेतन कडे जाणारा मार्ग हा १) धर्मविर कट ते परमार्थनिकेतन चौका पर्यत, २) नाशिक मुंबई सर्व्हिस रोडने नामदेववाडी कडे जाणारा संपुर्ण रस्ता, ३) गुरूकुल सोसायटी कडून धर्मविर रोड कडे जाणारा मार्गावर रोडच्या डावी कडील, ४) नाशिक मुंबई सर्व्हिस रोड ते नामदेववाडी कडे जाणा–या रोडचे कॉर्नरला तसेच ५) रामचंद्र टॉवरचे गेट समोर अशा मार्गावर रिक्षा, दुचाकी, चारचाकी तसेच बसेस व टेम्पो अशी वाहने रस्त्याचे बाजुला उभी केल्यामुळे अडथळा निर्माण होवुन मोठया प्रमाणात वाहतूक कोंडी होत असुन नमुद मार्गावर पी १ पी २ व नो पार्कींग करणे गरजेचे आहे. त्यामुळे सदर परिसरात वाहतूक कोंडी होऊ नये व परिसरातील वाहतूक सुरळीत व सुनिश्चित राहणे आम जनतेच्या सोईसाठी आवश्यक आहे.

त्याअर्थी, मी, **पंकज शिरसाट, पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर** म्हणून, मला महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र. एम.व्ही.ए.–११६/सीआर/३७/टीआर, दि. २७/०९/१९९६ चे अधिसुचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१) (अ) (ब) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून पुढीलप्रमाणे अधिसूचना जारी करीत आहे. :–

अ.क्र.	ठिकाणे	प्रकार	अंतर	वेळ
१	धर्मविर कट ते परमार्थनिकेतन चौका पर्यंत सर्व दुचाकी, रिक्षा, चारचाकी वाहने, टि.एम.टी. व खाजगी बसेस, ४०७ टेम्पो तसेच त्यावरील सर्व जड/अवजड वाहनांना	पी १ पी २	८०० मीटर	२४ तास
२	नाशिक मुंबई सर्व्हिस रोडने नामदेव वाडी कडे जाणारा संपुर्ण रस्ता सर्व दुचाकी, रिक्षा, चारचाकी वाहने, टि.एम.टी. व खाजगी बसेस, ४०७ टेम्पो तसेच त्यावरील सर्व जड/अवजड वाहनांना	पी १ पी २	२०० मीटर	२४ तास
३	गुरुकुल सोसायटी कडुन धर्मविर रोड कडे जाणाऱ्या रोडच्या डावी कडील बाजुस सर्व प्रकारच्या वाहनांना	नो पार्किंग	२०० मीटर	२४ तास
४	नाशिक मुंबई सर्व्हिस रोड ते नामदेव वाडी कडे जाणाऱ्या रोडचे कॉर्नरवर रोडच्या सर्व प्रकारच्या वाहनांना	नो पार्किंग	२० मीटर	२४ तास
५	रामचंद्र टॉवरचे गेट समोर सर्व प्रकारच्या वाहनांना	नो पार्किंग	२० मीटर	२४ तास

वर नमूद ठिकाणी **पार्किंग व्यवस्था** बाबत अधिसूचना प्रसिध्द झाल्याच्या तारखेपासून ३० दिवस प्रायोगिक तत्वावर लागू करण्यात येत आहे. काही हरकत अगर सूचना असल्यास त्या लेखी स्वरुपात पोलीस उप आयुक्त, शहर वाहतूक शाखा कार्यालय, तीन हात नाका, ठाणे ४००६०२ येथे पाठवाव्यात. याबाबत कोणाच्या काही हरकत अथवा आक्षेप प्राप्त न झाल्यास सदर अधिसूचना पुढील आदेश होईपावेतो कायम स्वरुपात अंमलात राहील.

सदर वाहतूक नियंत्रण अधिसूचना पोलीस वाहने, फायर ब्रिगेड, रुग्णवाहिका, ग्रीन कॉरीडोर, ऑक्सिजन गॅस वाहने व इतर अत्यावश्यक सेवेतील वाहनांना लागू राहणार नाही.

(पंकज शिरसाट)
पोलीस उप आयुक्त,
वाहतूक विभाग, ठाणे शहर.

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय, ठाणे.
२/– सदर अधिसूचना प्रसिध्द करण्यास विनंती आहे.

प्रत माहितीसाठी सविनय सादर

मा. पोलीस आयुक्त, ठाणे शहर
मा. पोलीस सह आयुक्त, ठाणे शहर
मा. जिल्हाधिकारी, ठाणे
मा. आयुक्त, ठाणे महानगरपालिका, ठाणे.
मा. अपर पोलीस आयुक्त, पश्चिम प्रादेशिक विभाग, ठाणे.
प्रादेशिक परिवहन अधिकारी, ठाणे.
पोलीस उप आयुक्त, परिमंडळ–१, ठाणे.
पोलीस उप आयुक्त, विशेष शाखा, ठाणे.
पोलीस उप आयुक्त, आर्थिक गुन्हे शाखा, ठाणे.
परिवहन व्यवस्थापक, ठाणे महानगरपालीका, ठाणे.
विभाग नियंत्रण कक्ष, राज्य परिवहन विभाग, ठाणे.
नियंत्रण कक्ष, ठाणे शहर
ठाणे पोलीस पत्रक

प्रत :– समन्वय अधिकारी ९ ए. एस. कक्ष, ठाणे.
२/– सदर अधिसूचना पोलीस नोटीसमध्ये प्रसिध्दीसाठी.

प्रत माहिती व कार्यवाहीसाठी,

स.पो.आ. ठाणे वाहतूक विभाग/पोनि नौपाडा वाहतूक उपविभाग.
२/– म.न.पा. ठाणे च्या संबंधीत अधिकाऱ्यांकडून आवश्यक सूचना फलके लावून घ्यावीत.